महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी ( महसूल ) तथा उपविभागीय दंडाधिकारी कुडाळ


तहसीलदार कार्यालय कुडाळ इमारत, पहिला मजला

ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, पिनकोड — ४१६ ५२०

दूरध्वनी क्र.- ०२३६२-२२३३२५ ई मेल — sdokudal@gmail.com


क्र. एमएजी/पोलीस पाटील/भरती/जाहिरनामा ०३/२३ दि. २८.१२.२०२३

संदर्भ- १. महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम, १९६७

२. महाराष्ट्र ग्राम पोलीस आदेश (सेवा, प्रवेश, पगार आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश, १९६८

३. महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन निर्णय क्र. बीव्हीपी ०२९९/सीआर-५६/पोल-८, दि. ०७.०९.१९९९

४. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.बीव्हीपी ११०७/प्र.क्र.५१५/पोल-८ दि. १६.१०.२००८

५. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.बीव्हीपी १११३/१७६७/प्र.क्र.५९२/पोल-८ दि.२२.०८.२०१४

६. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.बीव्हीपी ०६१३/प्र.क्र.३१२/पोल-८ दि. २७.०८.२०१४

७. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०२१/प्र.क्र.३८७/१६-ब(ए) दि. ०६.०७.२०२१

८. मा. जिल्हा दंडाधिकारी सिंधुदुर्ग यांजकडील पत्र क्र.गृह/डेस्क-३/पोलीस पाटील/पदभरती/२०२३ दि. १७.०७.२०२३

९. मा. जिल्हा दंडाधिकारी सिंधुदुर्ग यांजकडील पत्र क्र. गृह/डेस्क ३/पोलीस पाटील/पदभरती/२०२३ दिनांक ०२.११.२०२३

१०. या कार्यालयाची जाहिरात क्र. एमएजी/पोलीस पाटील/भरती/जाहिरनामा/२०२३ दि. २०.११.२०२३

११. या कार्यालयाची जाहिरात क्र. एमएजी/पोलीस पाटील/भरती/जाहिरनामा ०२/२०२३ दि. १५.१२.२०२३

## पोलीस पाटील पदभरती जाहिरनामा २०२३

### उपविभाग कुडाळ ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग

सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील (ता. कुडाळ व मालवण) या तालुक्यातील रिक्त पोलीस पाटील पदे असलेल्या गावात पोलीस पाटील पदभरतीसाठी संबंधित महसुली गावचे रहिवाशी असलेल्या अर्हताधारक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात ऑफलाईन पध्दतीने दि. २९.११.२०२३ ते १२.१२.२०२३ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६.१५ या वेळेत उपरोक्त वाचले क्र. १० चे जाहीरनाम्याव्दारे अर्ज मागविणेत आलेले होते. तथापी सदरचे दि. २०.११.२०२३ चे जाहिरनाम्यात नमुद केलेल्या गावनिहाय आरक्षणानुसार खालील गावांमध्ये एकही अर्ज प्राप्त झालेला नाही तसेच काही गावांमध्ये प्राप्त झालेले अर्जापैकी सर्व अर्ज हे अर्जांचे छाननीअंती अपात्र ठरल्याने त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे उपरोक्त वाचले क्र. ४ मध्ये नमुद शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे गावनिहाय अदलाबदलीचे आरक्षण प्रवर्ग (रकाना क्र. ५ मध्ये दर्शविलेनुसार) निश्चित करुन सदर प्रवर्गातील संबंधित महसुली गावचे रहिवाशी असलेल्या व पोलीस पाटील पदाची अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांकडुन दि. २०.१२.२०२३ ते २६.१२.२०२३ सकाळी १० ते सायंकाळी ६.१५ या वेळेत कालावधीत केवळ ऑफलाईन पध्दतीने संदर्भ क्र. ८ अन्वये अर्ज मागविणेत आलेले होते.

उपरोक्त संदर्भ क्र. ८ अन्वये दिनांक १५.१२.२०२३ रोजीच्या जाहिरनाम्यात नमूद केलेल्या गावनिहाय आरक्षणानुसार खालील गावांमध्ये एकही अर्ज प्राप्त झालेला नाही तसेच काही गावांमध्ये प्राप्त झालेले अर्जापैकी सर्व अर्ज हे अर्जांचे छाननीअंती अपात्र ठरल्याने त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झालेला नाही. सबब उपरोक्त वाचले क्र. ४ मध्ये नमुद शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे गावनिहाय अदलाबदलीचे आरक्षण प्रवर्ग (रकाना क्र. ६ मध्ये दर्शविलेनुसार) निश्चित करुन सदर प्रवर्गातील संबंधित महसुली गावचे रहिवाशी असलेल्या व पोलीस पाटील पदाची अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांकडुन दि. ०१.०१.२०२४ ते दि. ०५.०१.२०२४ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६.१५ या वेळेत कालावधीत केवळ ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | दि. २०.११.२०२३ चे जाहीरनाम्यानुसार आरक्षणाचा प्रवर्ग | दि. १५.१२.२०२३ चे जाहीरनाम्यानुसार आरक्षणाचा प्रवर्ग | दि. २८.१२.२०२३ चे जाहीरनाम्यानुसार आरक्षणाचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | कुडाळ | चाफेली | अनुसूचित जाती | अराखीव | अराखीव |
| २. | मालवण | पलिकडीलवाडी | अनुसूचित जाती (महिला) | अनुसूचित जाती | अराखीव (महिला) |
| ३. | कुडाळ | टेंबधुरीनगर | अनुसूचित जमाती | अनुसूचित जाती | अराखीव |
| ४. | कुडाळ | घाटकरनगर | अनुसूचित जमाती (महिला) | अनुसूचित जमाती | अराखीव (महिला) |
| ५. | कुडाळ | निरुखे | अनुसूचित जमाती (महिला) | अनुसूचित जमाती | अराखीव (महिला) |
| ६. | कुडाळ | हुमरमळा | अनुसूचित जमाती | अराखीव | अराखीव |
| ७. | मालवण | कुसरवे | अनुसूचित जमाती | अनुसूचित जाती | अराखीव |
| ८. | मालवण | मर्डे | अनुसूचित जमाती (महिला) | अनुसूचित जमाती | अराखीव (महिला) |
| ९. | कुडाळ | खोचरेवाडी | भटक्या जमाती ब (महिला) | भटक्या जमाती ब | अराखीव (महिला) |
| १०. | कुडाळ | नमसपूर | भटक्या जमाती ब (महिला) | भटक्या जमाती ब | अराखीव (महिला) |
| ११. | कुडाळ | खुटवळवाडी | भटक्या जमाती ब | अराखीव | अराखीव |
| १२. | कुडाळ | मुडयाचा कोंड | भटक्या जमाती क | इतर मागास प्रवर्ग | अराखीव |
| १३. | मालवण | अपराजवाडी | भटक्या जमाती क (महिला) | भटक्या जमाती क | अराखीव (महिला) |
| १४. | मालवण | तारकर्ली | विशेष मागास प्रवर्ग (महिला) | विशेष मागास प्रवर्ग | अराखीव (महिला) |
| १५. | कुडाळ | गांधीनगर | इतर मागास प्रवर्ग | अराखीव | अराखीव |
| १६. | मालवण | सर्जेकाट | इतर मागास प्रवर्ग (महिला) | इतर मागास प्रवर्ग | अराखीव (महिला) |
| १७. | मालवण | कावा | इतर मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग | अराखीव |
| १८. | मालवण | माळकेवाडी | इतर मागास प्रवर्ग (महिला) | इतर मागास प्रवर्ग | अराखीव (महिला) |
| १९. | मालवण | टेंबवाडी | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | अराखीव | अराखीव |
| २०. | मालवण | परबवाडा | अराखीव (महिला) | अराखीव | अराखीव |
| २१. | मालवण | डोंगरेवाडी | अराखीव | अराखीव | अराखीव |
| २२. | मालवण | नागझर | अराखीव | अराखीव | अराखीव |
| २३. | मालवण | बागवाडी | अराखीव (महिला) | अराखीव | अराखीव |

उक्त स्तंभामधील रकाना क्र. ३ मध्ये नमुद महसुली गावाकरीता रकाना क्र. ६ मध्ये निश्चित करणेत आलेल्या अदलाबदलीच्या आरक्षण प्रवर्गातुन पोलीस पाटील पदभरतीकरीता संबंधित महसुली गावातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांकडुन दि. ०१.०१.२०२४ ते दि. ०५.०१.२०२४ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६.१५ या वेळेत केवळ ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. सदर कालावधीनंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार

नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्याकरीता अर्ज विक्री व स्विकृतीचे ठिकाण हे संबंधित तहसिलदार कार्यालय राहील. तसेच पोलीस पाटील पदाचे अर्जाकरीता किमान आवश्यक अर्हता, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे, निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती, अर्ज करण्याची पध्दत, सामाजिक आरक्षण, सर्वसाधारण सुचना या बाबी हया दि. २०.११.२०२३ रोजी प्रसिध्द करणेत आलेल्या मुळ जाहिरनाम्यानुसार उमेदवारांवर बंधनकारक राहतील.

उपविभागीय दंडाधिकारी, कुडाळ
तथा, अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती कुडाळ - २०२३

प्रतिलिपी - १. मा.जिल्हा दंडाधिकारी, सिंधुदुर्ग यांना माहितीकरीता सविनय सादर.

२. जिल्हा माहिती व विज्ञान अधिकारी सिंधुदुर्ग यांजकडे

२/- पोलीस पाटील भरती २०२३ बाबत वरील जाहीरनामा जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन तसे या कार्यालयास कळवावे.

३. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार कुडाळ/मालवण यांजकडे

३/- सदर जाहिरनामा आपले तसेच वरीलप्रमाणे नमूद महसूली गावाचे तलाठी सजा कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करणेत यावा. उक्त तक्त्यातील नमूद महसूली गावात पुरेशी प्रसिध्दी देऊन एकत्रित अहवाल सादर करणेत यावा.

उपविभागीय दंडाधिकारी, कुडाळ
तथा, अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती
प्रक्रिया समिती कुडाळ - २०२३